पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक ४०९ दिनांक - ०५/०६/२०२३**

**अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे**

**पोलीस स्टेशन अंतर्गत दाखल असणारे दरोडा,चेन चोरी,घरफोडी चोरी व इतर गुन्हयातील चोरीस गेलेले सोने / चांदीचे दागिने फिर्यादी यांना पुनः प्रदानाचा कार्यक्रमा बाबत**

पोलीस प्रत्येक गुन्हयांचा तपास गांभीर्याने आणि परिश्रमपुर्वक करतात. त्यामुळे नागरिकांनी पोलीसांसोबत असणे, त्यांना सहकार्य करणे आणि प्रोत्साहन देणे गरजेचे आहे असे प्रतिपादन मा.चंद्रकांतदादा पाटील,उच्च व तंत्रशिक्षण तथा जिल्हयाचे पालक मंत्री यांनी केले.

पुणे शहर पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर येथे पुणे शहर पोलीस दलातर्फे आयोजित मुद्देमाल हस्तांतरण सोहळयात ते बोलत होते. सदर कार्यक्रमाला मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री.संदीप कर्णिक,मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे,श्री. प्रविणकुमार पाटील,मा.पोलीस उपायुक्त,परिमंडळ-१,श्री.संदिप गिल्ल,मा.पोलीस उपायुक्त, परिमंडळ-२,श्रीमती.स्मार्तना पाटील, मा.पोलीस उपायुक्त,परिमंडळ-३,श्री.सुहेल शर्मा,मा.पोलीस उपायुक्त, परिमंडळ-४,श्री.शशिकांत बोराटे,मा.पोलीस उपायुक्त,परिमंडळ-५,श्री.विक्रांत देशमुख, मा.पोलीस उपायुक्त, पोलीस मुख्यालय,पुणे,श्री.रोहिदास पवार आणि सर्व पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि गुन्हयाचे तपासी अधिकारी व पोलीस अंमलदार तसेच फिर्यादी हजर होते.

अलीकडच्या काळात गुन्हेगार अद्ययावत तंत्रज्ञानाचा उपयोग करीत आहेत. त्या तुलनेत पोलीस अत्यंत पोलीस अत्यंत मर्यादित साधनांसह आपले काम चा्ंगल्याप्रकारे करतात. पोलीसांना अद्ययावत शस्त्रे व साधने उपलब्ध करून देण्यासाठी आणि पोलीस वसाहतीच्या दुरूस्तीसाठी जिल्हा नियोजन समिती आणि समाजातील उत्तरदायित्व निधीच्या माध्यमातून १०० कोटी रूपयांचा निधी देण्यात येणार आहे अशी माहिती त्यांनी कार्यक्रमा दरम्यान दिली.

सदर कार्यक्रमाच्या प्रास्तविकात मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.रितेशकुमार, यांनी गुन्हे उघडकीस आणल्यावर मुद्देमाल हस्तगत करणे कठीण असते व पोलीस अधिकारी परिश्रमपुर्वक काम करतात आणि कायदेशीर बाबी पुर्ण करून मुद्देमाल फिर्यादींना हस्तांतरित केला जातो, **असा सुमारे ५ कोटी ३१ लाख रूपयांचा मुद्देमाल कार्यक्रमात हस्तांतरित करण्यात येत आहे, अशी माहिती त्यांनी दिली.**

**पालकमंत्री मा.चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते ५८ फिर्यादींना मुद्देमाल हस्तांतरित करण्यात आला तसेच गुन्हयातील मुद्देमाल हस्तगत करण्याची चांगली कामगिरी करणा-या १४ पोलीस अधिकारी-कर्मचा-यांचा प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तसेच पालकमंत्री मा.चंद्रकांतदादा पाटील यांनी स्वतः चांगली कामगिरी करणारे पोलीस अधिकारी अंमलदार यांना भेटवस्तू देऊन त्यांचे कौतुक केले.**

सदर कार्यक्रमाची सांगता मा.पोलीस सह आयुक्त पुणे शहर श्री.सदीप कर्णिक,यांनी कार्यक्रमास उपस्थित प्रमुख अतिथी, पोलीस अधिकारी व अंमलदार आणि नागरिक / फिर्यादी यांचे आभार मानुन केली.

**परिमंडळीय निहाय खालीलप्रमाणे फिर्यादी यांना मुद्देमाल परत करण्यात आला आहे.**

| परिंमडळ | एकुण रूपये |
|---|---|
| परिमंडळ-०१ | १,२४,३१,८८७/- |
| परिमंडळ-०२ | २५,२९,८००/- |
| परिमंडळ-०३ | ३८,९२,०६०/- |
| परिमंडळ-०४ | ३,१९,४३,३०५/- |
| परिमंडळ-०५ | २३,५०,०००/- |
| | |